देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बॅक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

क्र. देव वशि जा. ७६११/२०२४ दिनांक - 30 AUG 2024

## दरपत्रक मागणी सुचना

### श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान उपकार्यालय, कोल्हापूर कडील सुवर्ण पालखी स्थलांतरीत करणे करणे कामी आवश्यक कामे करणे बाबत

श्री. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई देवस्थान मंदिराकडील देवीची सुवर्ण पालखी गरुड मंडप मध्ये ठेवणेत आली आहे. गरुड मंडपाचे पुरातत्व विभागच्या निगराणीखाली जतन आणि संवर्धनाचे काम सुरु झाले आहे. त्याकरीता गरुड मंडप हा पुर्णपणे उतरविण्याचे काम सुरु झाले आहे. तथापी गरुड मडंपामध्ये असलेली सुवर्ण पालखी अन्यत्र स्थलांतरीत करणे गरजेचे व अनिवार्य आहे. यासाठी मंदिर उपकार्यालयातील उजवीकडील बाजू निश्चित करण्यात आली आहे. त्याकरीता जुन्या केबीनच्या काचा सुरक्षित रित्या काढणे, सदर काच कार्यालयाकडे शिफ्ट करणे व त्याकरीता आवश्यक फॅब्रिकेशनचे फ्रेम तयार करणे व पुन्हा बसविणेचे काम करणेचे आहे. त्याकरीता दरपत्रक मागणी करणेत येत आहेत.

| क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | जुन्या केबीन मधुन काचा सुरक्षित रित्या काढणे, सदर काच कार्यालयाकडे शिफ्ट करणे व त्याकरीता आवश्यक फॅब्रिकेशनचे फ्रेम तयार करणे व पुन्हा बसविणे इत्यादी कामे करणे | रु. ९८,०२१/- |

वरील प्रमाणे कामांकरीता कंपनीचे लेटरपॅड वर सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि. ०६/०९/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपुर्वी पोहोच करणेत यावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक देणा-यांचे नाव व संपर्क नंबर नमुद करावा.

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. सदर कामाची समक्ष जागेवर तपासणी करुनच दरपत्रक देणेचे आहे.
२. सदर कामी या कार्यालयाकडील उपअभियंता यांचेसोबत पाहणी करुन आवश्यक कामाची माहिती घेवून दर नमुद करणेचा आहे.
३. सदर काम मुदतीमध्ये पुर्ण करणेचे आहे.
४. सदर दरपत्रकामध्ये नमुद करणेत येणारे दर हे सर्व करासहित, सर्व आवश्यक साहित्य व वाहतुक खर्चासहित देणेचे आहेत.
५. दरपत्रक मंजूर झाले नंतर कोणत्याही कारणास्तव दर वाढवून दिले जाणार नाहीत.
६. सदर कामाची ऑर्डर मिळताच आवश्यक्तेप्रमाणे काम पुर्ण करणेचे आहे.
७. दिले मुदतीमध्ये दरपत्रक प्राप्त न झालेस स्विकारले जाणार नाही.
८. दरपत्रकासोबत सोबत मक्तेदाराने पॅन कार्ड साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
९. दरपत्रकासोबत जीएसटी सर्टीफिकेट (लागू असलेस) त्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

Shivraj
३०/०८/२०२४
सचिव
देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत -

१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी
२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) स्थानिक मंदिराकडे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी